महाराष्ट्र टाइम्स

31.08.2020 Page No.07

# परवडणाऱ्या घरांसाठी 'प्रजा'च्या योजना

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

करोनाने निर्माण केलेल्या परिस्थितीत मुंबईसारख्या जगातील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेल्या शहरात परवडणारी घरे हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. त्यासाठी 'प्रजा फाऊंडेशन'ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालात वेगवेगळ्या योजनांमधून घरांची स्वप्ने पाहणाऱ्या आणि ती न परवडू शकणाऱ्या कष्टकरी, कामगारवर्गास घरांचा पर्याय उपलब्ध करण्यासाठी योजना मांडल्या आहेत.

'महाराष्ट्रातील शहरांमध्ये पुरेशा स्वरूपात सर्वांसाठी घरांची निकड-करोनापश्चात २०१९' हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात शहर नियोजनकार शिरीष पटेल, प्रजा फाऊंडेशनचे विश्वस्त अनुज भगवती यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे अहवाल सादर केला.

### अल्पकालीन उपाय

धारावी, गोवंडी, सोनापूर, मालवणी आदी झोपडपट्ट्यांसाठी अल्पकालीन उपायांची शिफारस करण्यात आली आहे. कमी उत्पन्न गटांतील रहिवाशांसाठी महानगर क्षेत्रात सरकारच्या पुढाकाराने विक्री न झालेल्या अशाप्रकारच्या तयार, उपलब्ध घरांची खरेदी आणि भाडेपट्ट्यावर घरे उपलब्ध करून देणे. साधारणपणे या घरांची

## राहण्यायोग्य घरांच्या उपलब्धतेवर भर

किंमत त्या बांधकाम खर्चाची असावी. उर्वरित खर्च सरकारकडून उचलला जाईल वा विकासकांना अनुदान या इतर लाभांमार्फत त्याची पूर्तता केली जाईल, अशी सूचना केली आहे.

### मध्यम कालावधीतील योजना

एमआयडीसीत सवलतीच्या दरात व्यावसायिक स्तरावरील भूभाग उपलब्ध करता येतील. या उद्योगक्षेत्रातील ज्या कामगारांना घरे घेणे परवडतील, ते उपलब्ध असलेल्या परंतु विक्री न झालेल्या साठ्यातून घरे घेऊ शकतील. या घरांच्या किमती बांधकाम खर्चाएवढ्या असतील. ज्यांना घरे घेणे परवडणार नाही त्या कामगारांना भाडेतत्त्वावर घरांची पूर्तता करता येऊ शकेल.

### दीर्घकालीन योजना

दीर्घकालीन कालावधीचा विचार करताना मुंबईतील उपनगरांतील वसई, उरन आदी भागात गृहबांधणी क्षेत्रास प्रोत्साहन देताना तिथे सार्वजनिक वाहतुकीचे जाळे भक्कम करण्याचा मुद्दा मांडला आहे. या योजनांमधून गृहनिर्माण क्षेत्रास प्रोत्साहन मिळेल.